## इयत्ता नववी

# कृती संशोधन प्रकल्प विषय (2017–18)

# शाश्वत पर्यटन

### प्रस्तावना

सद्यःस्थितीत पर्यटन उद्योग जगभर अत्यंत वेगाने वाढत असून, अनेक देशांसाठी उत्पन्नाचा महत्त्वाचा स्रोत ठरला आहे. स्थानिक अर्थव्यवस्थेचे आणि रोजगार निर्मितीचे हे एक प्रभावी माध्यम आहे.

पर्यटनाची व्याख्या म्हणजे एखाद्या व्यक्तीने एखाद्या जागेला दिलेली भेट होय. या भेटीमागे व्यक्तीचा विशिष्ट हेतू असतो. प्रामुख्याने व्यवसाय, आरोग्य, शिक्षण, विश्रांती इत्यादी कारणांसाठी पर्यटन केले जाते.

पर्यटन ही व्यापक तांत्रिक संकल्पना असून, त्याचे मापन संख्याशास्त्रीय दृष्टिकोनातून पर्यटकांची संख्या आणि खर्च (मागणी आणि पर्यटकांना दिल्या जाणाऱ्या विविध पूरक सुविधा पुरविणे) यांद्वारे केले जाते.

### पर्यटन व पर्यटकांचे प्रकार :

- **प्रोत्साहन पर्यटन** : यात प्रामुख्याने ज्या कंपनीत व्यक्ती कामगार म्हणून कार्यरत असते, तिच्यावर सोपविलेल्या जबाबदाऱ्या उत्तमरीत्या पूर्ण केल्याबद्दल कंपनीच्या प्रशासनाकडून त्या व्यक्तीला बक्षिसादाखल कंपनीच्या पॅकेजमधून प्रोत्साहन म्हणून देशात अथवा परदेशांत पर्यटनाची संधी मिळते.
- **आरोग्य/वैद्यकीय पर्यटन** : एखाद्या व्यक्तीला आरोग्यविषयक समस्या निर्माण झाल्यास त्यावरील उपचारांसाठी किंवा अल्प खर्चात प्रभावी उपचारासाठी देशातल्या इतर राज्यांत किंवा परदेशात जावे लागते.
- **व्यावसायिक पर्यटन** : विविध बहुराष्ट्रीय कंपन्या किंवा इतर कंपन्यांनी आयोजित केलेल्या परिषदा, हॉटेल्स इत्यादींचा समावेश होतो.
- **शैक्षणिक** : उच्च शिक्षणासाठी, विविध कौशल्ये प्राप्त करण्यासाठी परिषदांचे आयोजन, कार्यशाळा, क्षेत्रभेटी, शैक्षणिक सहली इत्यादी.
- **साहसी पर्यटन** : गिर्यारोहण, नौकानयन, समुद्र सफारी इ.
- **सांस्कृतिक** : ऐतिहासिक वास्तूंना भेटी, सांस्कृतिक कला महोत्सवांना उपस्थिती. उदा. ताजमहाल, अजंठा–वेरूळ लेणी इत्यादी.
- **पर्यावरण पर्यटन** : एखाद्या परिसरात वाढत्या प्रदूषणामुळे तेथील प्रभावित भागांना भेटी देऊन त्यांचे संवर्धन व संरक्षण करणे. उदा. हिमालय पर्वत इत्यादी.
- **मनोरंजन** : दीर्घ किंवा अल्प मुदतीच्या सुट्टीच्या कालावधीत मनाला विरंगुळा म्हणून, सुट्टीचा आनंद उपभोगण्यासाठी केलेले पर्यटन.
- **धार्मिक पर्यटन** : व्यक्तीने आपल्या रूढी आणि परंपरा जपण्यासाठी, धर्माचे पालन करण्यासाठी केलेले पर्यटन. उदा. हज, मक्का, चारधाम यात्रा, व्हॅटिकन सिटीला भेट.
- **क्रीडा आणि मनोरंजन** : खेळ खेळण्यासाठी अथवा सामने पाहण्यासाठी परदेशात जाणे. यात क्रिकेट, फूटबॉल, बॅडमिंटन, टेनिस इत्यादी खेळांचा समावेश.
- **युवा पर्यटन** : पर्यटनात कमीत कमी साधनांचा प्रभावी वापर, खर्चावर मर्यादा ठेवणे.
- **विशेष पर्यटन** : आपल्या विषयाचा सखोल अभ्यास करण्यासाठी कला रसास्वाद असणाऱ्या पर्यटकांचा समावेश यात होतो. उदा. पुस्तक जत्रा, कार शो, पक्षी निरीक्षण, खाद्य महोत्सव इत्यादी.
- **कृषी पर्यटन** : कृषिविषयक आवड असणारे. यात नर्सरी, फार्म्स, उद्याने यांच्या भेटी. उदा. सगुणा बाग – नेरळ, बोटॅनिकल गार्डन इत्यादी.

## पर्यटनाचे फायदे :

**1. आर्थिक :**

- रोजगार निर्मिती
- लघुउद्योगांना चालना
- शासनासाठी महसूल गोळा होण्यास साहाय्य

**2. सामाजिक :**

- पर्यटकांच्या भेटीमुळे स्थानिक लोकांसाठी मूलभूत भौतिक सुविधा विकसित होण्यास मदत
- पर्यटनामुळे पारंपरिक रूढी व परंपरा यांचे जतन होण्यास मदत. हस्तोद्योगाला चालना
- आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या लोकांच्या पर्यटनानिमित्त त्या परिसराला भेटींमुळे स्थानिक समस्या जागतिक स्तरावर पोचविण्यासाठी पर्यटन हे एक प्रभावी साधन

**3. पर्यावरणीय :**

- वन्यजीव, वर्षा वने, नैसर्गिक साधनसंपत्तीचे जतन करणे पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यावश्यक पर्यावरणीय व्यवस्थापन आणि नियोजनामुळे नैसर्गिक साधनसंपत्तीच्या संवर्धनास मदत
- पर्यावरणविषयक जागरूकता लोकांमध्ये निर्माण करण्यासाठी जास्तीत जास्त लोकांचा समावेश आवश्यक. एखाद्या परिसरातील आकर्षणाच्या नैसर्गिक ठिकाणाची ओळख निर्माण करून त्याचे संवर्धन करण्याची गरज
- नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन करण्यासाठी अशा ठिकाणी पर्यटकांच्या संख्येवर बंधन घालणे आवश्यक. उदा. सातारा जिल्ह्यातील कास पठार येथे दरदिवशी भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या निश्चित

## पर्यावरणाचे नकारात्मक परिणाम :

जेव्हा नैसर्गिक स्रोतांचा लोकांच्या गरजेपेक्षा जास्त उपभोग घेतला जातो, तेव्हा पर्यावरणावर त्याचा नकारात्मक परिणाम होतो.

**1. आर्थिक :**

- पर्यटनात निर्माण झालेला रोजगार हा हंगामी स्वरूपाचा असतो. तसेच तेथील काम करणाऱ्या कामगारांना किमान वेतनदेखील दिले जात नाही.
- मूलभूत भौतिक सुविधांचा विकास साधत असताना उदा. रस्तेबांधणी, पाणीपुरवठा इत्यादी यांच्या बांधणीचा खर्च हा शासनाला करावा लागतो.
- पर्यटनातून निर्माण झालेला महसूल हा स्थानिक लोकांच्या कल्याणासाठी प्रत्येक वेळी वापरला जात नाही. तो प्रामुख्याने त्या ठिकाणी असणाऱ्या आंतरराष्ट्रीय कंपन्यांना जातो. कारण त्या ठिकाणी त्यांच्या मालकीची हॉटेल्स असतात.

**2. सामाजिक :**

- पर्यटकांच्या वर्तनाचा परिणाम तेथील स्थानिक समुदायांच्या व्यक्तींच्या वर्तनावर होतो. परिणामी राहणीमानावर होतो.
- गर्दी आणि वाहतूककोंडी वाढते.
- स्थानिक लोकांमध्ये पर्यटकांचे अनुकरण केल्याने मद्यपान, व्यसनाधीनता वाढण्याची शक्यता बळावते.
- गुन्हेगारी प्रवृत्ती वाढते.
- स्थानिक लोकांचे स्थलांतर तेथील हॉटेल किंवा सुशोभीकरणाच्या नावाखाली केले जाते. यासाठी योग्य मोबदला दिला जात नाही.
- पारंपरिक संस्कृती, मूल्ये यांचा ऱ्हास होतो.

**3. पर्यावरणीय :**

- **नैसर्गिक साधनस्रोतांचा ऱ्हास** : पर्यटनामुळे पाण्याचा अति वापर होतो. यात हॉटेल्स, जलतरण तलाव, गोल्फ कोर्स, पर्यटकांच्या वैयक्तिक वापरासाठीचे पाणी यांचा समावेश असतो. यामुळे पाण्याची कमतरता निर्माण होते. ज्या भागात पाण्याची कमतरता आहे, त्या ठिकाणी मोठी समस्या निर्माण होते. उदा. राजस्थान इत्यादी.
- **स्थानिक स्रोत** : हंगामी काळात स्थानिक स्रोतांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. उदा. ऊर्जा, अन्न, कच्चा माल.
- **भूसंस्खलन** : पर्यटन व मनोरंजनाच्या साधन-सुविधेसाठी मोठ्या प्रमाणावरील बांधकाम, जमिनीचे उत्खनन यांमुळे भूसंस्खलन होते. इंधनासाठी जंगलातील लाकूड गोळा केले जाते, परिणामी जमीन मोकळी राहिल्यामुळे जमिनीची धूप होते.

**हवा आणि ध्वनिप्रदूषण :**

- वाढते दळणवळण आणि ऊर्जेचा अति वापर यांच्या परिणामामुळे हरितगृह वायूंचे प्रमाण वाढले आहे.
- थंड हवेच्या ठिकाणी कक्ष तापमानात वाढ झाल्याचे दिसून येत आहे.
- पर्यटकांची वाढती संख्या व त्यांची वाहने यांमुळे प्रदूषण वाढत आहे. काही वेळा वाहन थंड राहण्यासाठी वाहनातील वातानुकूलित यंत्रणा वाहनचालक पर्यटक पर्यटन करावयास बाहेर गेला असेल, तरी सुरूच ठेवतात.
- **ध्वनिप्रदूषण** : कार, बस, विमाने, बांधकामात वापरली जाणारी यंत्रे यांच्या सततच्या होणाऱ्या आवाजामुळे स्थानिक परिसरातील संवेदनशील पशु–पक्षी यांचे स्थलांतर झाल्याने त्यांच्या नैसर्गिक प्रकृतीत परिणाम दिसून येतो.
- **घनकचरा व्यवस्थापन** : ज्या ठिकाणी पर्यटकांची मोठ्या प्रमाणावर संख्या असते, त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर टाकाऊ पदार्थांची निर्मिती होते. त्यामुळे तेथे निर्माण होणाऱ्या टाकाऊ पदार्थांची विल्हेवाट लावणे ही एक समस्या बनते. टाकाऊ पदार्थांचे योग्य नियोजन न केल्यास पर्यावरण प्रदूषित होते. उदा. क्रूझवर आलेल्या अथवा ट्रेकिंगसाठी आलेल्या पर्यटकांनी निर्माण केलेला कचरा गोळा करणे व त्याची विल्हेवाट लावणे यासाठी लागणाऱ्या साधनांची अशा ठिकाणी कमतरता असते.
- **सांडपाणी** : पर्यटकांच्या वाढत्या संख्येमुळे सांडपाण्याचे प्रमाण वाढते. परिणामी युट्रोफिकेशन (सुपोषण) होते व मानवी तसेच प्राण्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतो.
- **सौंदर्यात्मक प्रदूषण** : पुरातन वास्तूला इजा पोचविणे, त्यावर स्वतःची नावे लिहिणे यामुळे पुरातन वास्तूचे विद्रूपीकरण होते व तेथील सौंदर्यावर परिणाम होतो.

## भौतिक परिणाम :

पर्यटकांची आवडती स्थळे, उदा. तलाव, नदी, समुद्रकिनारे, पर्वत या ठिकाणातील परिसंस्था यांवर बांधकाम आणि जमिनीचे उत्खनन यामुळे विपरीत परिणाम होतो.

पर्यटकांच्या या हानिकारक वर्तनामुळे जैवविविधतेवर परिणाम होतो. जमिनीची धूप होते, मातीत हवा मिसळते, पाणी धरून ठेवण्याची क्षमता कमी होते. वनस्पतींची पुनर्जनन क्षमता कमी होते. जमिनीची धूप झाल्यामुळे मातीतील विविध प्राण्यांच्या प्रजातींना हानी पोचते.

सागरी क्षेत्रातील पर्यटनात तेथील संवेदनशील परिसंस्थेवर विपरीत परिणाम होतात. स्कुबा डायव्हिंग, याट अथवा क्रूझची सफर, मासेमारी इत्यादी खेळांचा सागरी परिसंस्थेवर प्रत्यक्ष परिणाम होतो. शिवाय मासेमारीमुळे सागरी किनारा संवर्धनावर परिणाम होतो.

या वरील सर्व घटनेचा सापेक्ष विचार केल्यास शाश्वत पर्यटनाची गरज लक्षात येते.

## शाश्वत पर्यटन म्हणजे काय?

ही एक व्यापक संकल्पना असून, यात पर्यटक एखाद्या पर्यटनस्थळाला भेट देतो, तेव्हा त्याचे सकारात्मक परिणाम पर्यावरण, समाज आणि अर्थव्यवस्थेवर होतात. पर्यटनात दळणवळण, निवासाची सोय, करमणूक, खरेदी यांचा समावेश होतो.

शाश्वत पर्यटन म्हणजे पर्यटक आणि स्थानिक यांच्या ऐतिहासिक वास्तू व पर्यावरण यांचा सन्मान राखणे होय. ही एक पर्यावरणबाबत सामाजिक बांधिलकी असून, यात पर्यटन संवर्धनासह स्थानिकांच्या आर्थिक, सामाजिक संवर्धनाचाही विचार अंतर्भूत आहे.

## शाश्वत पर्यटनाची गरज :

- शाश्वत पर्यटनासाठी स्थानिकांचा अधिकाधिक सहभाग आणि सर्वसमावेशक नेतृत्वाची आवश्यकता
- शाश्वत पर्यटनांच्या परिणामांबाबत नियमित देखरेख, सुधारणा, प्रतिबंधात्मक उपायांची गरज असते.
- पर्यटकांच्या समाधानाला प्राधान्य देतानाच त्यांच्यात शाश्वत पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण करावी.

**शाश्वत पर्यटन हे करू शकते :**

- नैसर्गिक स्रोतांचा नियोजनपूर्वक वापर केल्यामुळे पर्यटन विकास, विविध जैविक प्रक्रियांचे नियमन आणि नैसर्गिक वास्तूंचे व जैवविविधतेचे जतन करता येईल.

- सामाजिक, सांस्कृतिक घटकांबाबत आदर, पारंपरिक मूल्ये, रूढी, आंतरराष्ट्रीय सामंजस्य आणि सहिष्णुता जपली जाईल.
- दीर्घकाळपर्यंत स्थिर आर्थिक घटकांची शाश्वती, कायमस्वरूपी रोजगार, साधनसंपत्तीचे समान वितरण, भागधारकांना त्यांच्या गुंतवणुकीप्रमाणे फायदा प्राप्त करून देणे.

## हे कसे करता येईल?

शाश्वत पर्यटन हे प्रामुख्याने साधनांच्या मर्यादा आणि विनियोग यांचे संतुलन करणे होय. यासाठी दीर्घ मुदतीच्या योजना (साधारणपणे १० ते २० वर्षे), अपरिवर्तनीय आणि संचित विचारांची वर्तमान स्थितीत गरज आहे.

**शाश्वत पर्यटनाच्या बाबतीत खालील प्रमुख क्षेत्रांचा विचार करता येईल :**

- भक्कम आर्थिक, व्यावसायिक व पर्यावरणीय व्यवस्थापन
- सामाजिक, सांस्कृतिक घटकांविषयीची संवेदनशीलता
- प्रभावी प्रशिक्षण आणि ग्राहकोपयोगी सेवा
- सर्व भागधारकांचा समावेश आणि दखल
- सुशासन आणि दीर्घकालीन योजना
- सकारात्मक घटकांच्या विपणन आणि संप्रेषण (मार्केटिंग व कम्युनिकेशन) कार्यक्रमाचा समावेश

## पर्यटनाची भूमिका

पर्यटन उद्योग हा प्रामुख्याने पर्यटकांच्या सुखसुविधांसाठी निर्माण झालेला आहे. तरीसुद्धा पर्यटकाला वैयक्तिक स्वरूपात स्वनियंत्रण आणि वैयक्तिक जबाबदारी याची जाणीव असली पाहिजे. त्याच्यासाठी पर्यटन हे आनंददायी, सन्मानपूर्वक आणि शाश्वत कृतियुक्त व्हायला पाहिजे.

## जबाबदार पर्यटकाची वैशिष्ट्ये :

- पर्यटक ज्या भागात पर्यटन करणार आहे, त्या समुदायातील एक घटक मानून त्याने इतस्ततः कचरा फेकू नये.
- अतिरिक्त टाकाऊ वस्तू निर्माण करू नयेत.
- कमीत कमी ऊर्जेचा वापर करावा.
- सामान्यपणे असे निदर्शनास येते, की काही व्यक्ती पर्यटनात त्यांचे कपडे सुकविण्यासाठी त्यांच्या निवासस्थानात पंखे सुरू ठेवून बाहेर जातात. किंवा उन्हाळ्यात रूम थंड राहण्यासाठी एसी सुरू ठेवूनच बाहेर निघून जातात. असे करणे टाळावे.
- पाण्याच्या संवर्धनाबाबत पर्यटनाला जाण्यापूर्वी पर्यटकाने स्वतःला शिक्षित करून घेणे गरजेचे आहे.
- सांस्कृतिक विविधतेचा सन्मान केला पाहिजे. त्याची विटंबना करू नये.
- लुप्त होणाऱ्या प्राण्यांच्या प्रजातींची खरेदी किंवा त्यांचा खाण्यासाठी उपयोग करू नये. उदा. कासवाची अंडी, सापाच्या कातडीच्या बॅगा, वाघनखांचा वापर.
- स्थानिक अर्थव्यवस्थेला साहाय्य करणे.
- हंगामी फळे, स्थानिक फळांचा खाद्यपदार्थांत समावेश करावा. जेणेकरून कार्बन फूट प्रिंट कमी होण्यास मदत होईल.
- शक्यतो सार्वजनिक वाहनांचा वापर करावा.

## पर्यटनाच्या विविध दृष्टिकोनाची उदाहरणे

- पर्यटन कृती कार्यक्रमांची निर्मिती : उदा. वेळास येथील 'कासव बचाव' मोहीम, भिलार येथील 'पुस्तकांचे गाव' असे उपक्रम.
- ताजमहाल वास्तूशेजारील औद्योगिक कारखान्यांवर बंदी.
- ताडोबा अभयारण्यास भेट देणाऱ्या पर्यटकांच्या संख्येवर नियंत्रण.
- सातारा जिल्ह्यातील कास पठार येथील जैवविविधतेचे संवर्धन.
- मोठ्या प्रमाणावर टाकाऊ पदार्थ गोळा करणाऱ्या संस्था, स्वच्छता अभियान राबवणाऱ्या संस्थेच्या बातम्या आणि कात्रणे यांचे संदर्भ, संग्रह गोळा करणे.
- शासनामार्फत पुरविल्या जाणाऱ्या विविध पर्यटन स्थळांवरील सुविधा उदा. हज यात्रा, अमरनाथ यात्रा, कुंभमेळा इत्यादी.

- वाघ, मगरींचे संवर्धन, सागरी किनाऱ्यावरील सुंद्रीच्या झाडांचे (खारफुटी जंगलांचे) व भारतातील विविध राष्ट्रीय उद्यानांचे संवर्धन व निगा.

## पर्यटनाच्या काही दृष्टिकोनांचा अभ्यास करता येईल

- दीर्घकालीन सुट्टीच्या नियोजनांचे विश्लेषण/ सुट्टीचे प्रकार यात कुटुंब/शाळा/कार्यालये यांचा समावेश शाश्वत पर्यटन बनविण्यासाठी करता येईल.
- शाश्वत पर्यटनात स्थानिक आणि हंगामी खाद्यपदार्थांचे महत्त्व.
- वर्तमान स्थितीतील भौतिक सुविधांचे, पर्यावरणपूरक सुविधा निर्माण करण्यासाठी उपाययोजना बनविणे.
- प्रवासात ऊर्जा, इंधन यांचा उपभोग यांत शाश्वतता निर्माण करणे.
- स्थानिक अज्ञात पर्यटनस्थळांचा शोध घेऊन त्यांच्या विकासाच्या योजना बनविणे.
- उत्कृष्ट रिसॉर्टसाठी पर्यावरणपूरक, शाश्वत परिपत्रके तयार करणे.
- पर्यटनाचा स्थानिक परिसंस्थेवर होणारा परिणाम अभ्यासणे.
- टाकाऊ पदार्थांची निर्मिती आणि विल्हेवाट यांचा अभ्यास करणे. उदा. महाबळेश्वर येथील मक्याची कणसे विकणारा फेरीवाला, चौपाटीवरील चाट विकणारा फेरीवाला, कोणत्याही पर्यटनस्थळावर इतस्ततः कचरा फेकणारे लोक व फेरीवाले.
- धार्मिक स्थळांवरील पारंपरिक पद्धतीने होणाऱ्या कृतीतून निर्माण होणारे निर्माल्य. उदा. मंदिराच्या परिसरात नारळ फोडणे.
- पर्यटनादरम्यान जमिनीवरील विविध हालचाली. उदा. घोडेस्वारी, वाहनांच्या पार्किंगसाठी रस्ते निर्मिती इत्यादी.
- मोठ्या आवाजामुळे स्थानिक पक्ष्यांच्या हालचालींवर होणारा परिणाम. उदा. रेन डान्स करताना वापरले जाणारे लाऊड स्पीकर.
- खाद्यपदार्थांच्या सवयी आणि बदलणारी खाद्यसंस्कृती. उदा. सर्व ठिकाणी सहज उपलब्ध होणारे चायनीज पदार्थ, पावभाजी, चाट, ढाब्यावरील जेवण इत्यादी.

वरील काही उदाहरणे माहितीसाठी दिली आहेत. विद्यार्थ्यांनी यांपैकी किंवा यासारखा इतर कोणताही एक दृष्टिकोन निवडून त्याची सविस्तर मांडणी करावी.

## विद्यार्थ्यांनी काय करावे?

- माहिती पुस्तिका काळजीपूर्वक वाचा.
- शाश्वत पर्यटन या विषयावर दृष्टिकोन टाकणारा एक विषय निवडा.
- यासाठी शाळा/घर/सभोवतालच्या परिसराचे निरीक्षण किंवा सर्वेक्षण करून आपला पर्यटनविषयक विषय निवडा.
- सध्या अस्तित्वात असलेली प्रवास योजना/भौतिक सुविधा/ वातावरण इत्यादी तुमच्या क्षेत्रानुसार निवडा.
- प्रामुख्याने शाश्वत बदल कोणत्या भागात करता येईल त्यावर लक्ष केंद्रित करा.
- विषय योजना बनविताना शक्यतो यात किमान बदल दिसला पाहिजे. यासाठी वेळ, खर्च या मर्यादांचा विचार करा.
- अंमलबजावणी काय करता येईल त्याचे विश्लेषण करा.
- निष्कर्षांचे विश्लेषण आणि त्यानंतर अनुमान काढा.
- अहवाल लिहा.
- जर तुम्ही शाश्वत पर्यटन या विषयावर पत्रिका तयार करण्याचा विचार करत असाल, तर खालील गोष्टी विचारात घ्या.
- पार्श्वभूमी, संशोधन पद्धती, नियोजन, आवश्यक माहिती आपल्या प्रकल्पात पत्रिकेच्या आराखड्यासह लिहा.

(संदर्भ : *www.google.com*)